# अभियांत्रिकी महाविद्यालय,

शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

☎ २५५०७१०८ फॅक्स : २५५०७२९९


जा. क्र. अमपु/आस्था-३/०९/ 3136 २५.६.२००९

कार्यालयीन आदेश :

विषय : संस्थेतील वसतिगृहामध्ये अँटी रॅगिंगसाठी समिती गठीत करणेबाबत.

अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, वसतिगृह व संस्थेच्या आवारामध्ये कोणत्याही प्रकारचे रॅगिंग होऊ नये याची दक्षता घेण्याबाबत संस्थास्तरावर उपरोक्त संदर्भांकित आदेशान्वये निम्नस्वाक्षरीकार खालीलप्रमाणे समिती गठीत करत आहेत.

| | |
|---|---|
| १. अधिष्ठाता, विद्यार्थी | अध्यक्ष |
| २. मुख्य कुलमंत्री | सदस्य |
| ३. श्रीमती एस. कविश्वर, महिला कुलमंत्री | सदस्य |
| ४. श्री. जी.बी.जोशी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ५. जनरल सेक्रेटरी वसतिगृह | सदस्य |

सदर समितीकडे रॅगिंगसंदर्भात विद्यार्थ्यांनी तक्रार अर्ज केले तर त्या तक्रार अर्जांची संपूर्ण शहानिशा करून दोषी विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात निम्नस्वाक्षरीकारांस अहवाल सादर करावा.

सदर समिती हा कार्यालयीन आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून पुढील कार्यालयीन आदेश निर्गमित होईपर्यंत कार्यान्वित राहिल.

संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.

प्रति

सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी (विभाग प्रमुखांमार्फत).

प्रत : सर्व विभाग प्रमुख/अधिष्ठाता यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
विभाग प्रमुखांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना सदर समितीविषयी कळवावे व तसा अनुपालन अहवाल कार्यालयास सादर करावा.

Adeshenq09/25609